# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२-२२६११०१५

MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai - 400 001 Website: www.msbnpe.org E-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- ०२२-२२६११०१५

---

क्र मराशुपशिमं/ संलग्नता / 17047 /२०२४ दिनांक - 27/०९/ २०२४

प्रति,
सर्व संलग्नीत ए.एन.एम व जी.एन.एम ,
प्राचार्य/संस्थाप्रमुख,
महाराष्ट्र राज्य.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता मंडळाकडून ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्याक्रमाकरीता संलग्नता देण्याबाबत.

संदर्भ :- १. क्र. मराशुवपशिमं/सलंग्नता/१४८३७/२०२४, दिनांक - २८/०५/२०२४
२. क्र. मराशुवपशिमं/सलंग्नता/१५४७२/२०२४, दिनांक - ०१/०७/२०२४
३. क्र. मराशुवपशिमं/सलंग्नता/१५७२३/२०२४, दिनांक - २६/०७/२०२४
४. क्र. मराशुवपशिमं/सलंग्नता/१६१२५/२०२४, दिनांक - २६/०८/२०२४
५. क्र. मराशुवपशिमं/सलंग्नता/१६७६१/२०२४, दिनांक - १९/०९/२०२४

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये सर्व प्राचार्य/संस्थाप्रमुख यांना कळविण्यात येते की, मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता संलग्नता पत्र देण्यापूर्वी प्रत्येक संलग्नित संस्थेने Online Affiliation Registration करून घेण्यात यावे, याबाबतचे परिपत्रक दिनांक २८/०५/२०२४ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात आले होते, परंतु असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही काही संस्थामार्फत Online Affiliation Registration केल्याचे दिसुन येत नाही.

त्यामुळे **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता संलग्नता (Affiliation) मिळण्याकरीता दिनांक २८/०९/२०२४ ते २५/१०/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.** या कालावधीत दिलेल्या लिंक वरुन Online पध्दतीने Online Affiliation Registration केल्यानंतर संस्थेची सर्व आवश्यक माहिती व मुळ कागदपत्रे Upload करून Submit करावे.

संस्थेमार्फत भरण्यात आलेली माहिती व मुळ कागदपत्रांची पडताळणी मंडळामार्फत करण्यात येईल. मंडळाकडून मान्यता (Approval) झाल्यानंतर संस्थेने संलग्नता शुल्क (Affiliation Fees) चा भरणा Online पध्दतीने करावा.

संस्थेकडून Upload करण्यात आलेली माहिती व मुळ कागदपत्रांमध्ये काही त्रुटी किंवा चुकीची माहिती आढळल्यास त्रुटींची पुर्तता दि.२८/०९/२०२४ ते २५/१०/२०२४ या कालावधीत करावी, त्यानंतरच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता **संलग्नता पत्र** देण्यात येईल. सदर संस्थेमार्फत त्रुटींची पुर्तता न झाल्यास सदरील संलग्नता अर्ज (Affiliation Form) रद्द करण्यात येईल, तसेच संलग्नता पत्र देण्यात येणार नाही.

यापुढे मंडळामार्फत Online Affiliation Registration करण्याकरीता मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी. **विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक व आर्थिक नुकसाना करीता तसेच कायदेशिर बाबी उद्भवल्यास सर्वस्वी प्राचार्य / संस्थाप्रमुख जबाबदार राहतील.**

Online Affiliation Registration करताना काही अडचणी आल्यास खालील मंडळाच्या दूरध्वनीवर संपर्क करावा.

<u>मोबाईल नंबर - ८९७६२७९९३१ ( IT- Department )</u>

संचालक

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत माहितीस्तव सविनय सादर:

१) मा. प्रधान सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नविन मंत्रालय, गो.ते. रू.संकुल, मुंबई

२) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तथा आयुष विभाग, मुंबई.

३) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.